२

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी समाजसुधारक ते संत

संशोधिका
प्रा. सौ.नेहा मिलींद वैद्य

मार्गदर्शिका
डॉ. विजया वाड
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

**प्रस्तावना:**

ठाणे आणि रायगड जिल्हाचा एकूण भौगोलिक आराखडा बघता येथे आग्री, कोळी, भंडारी, चौकळशी, माळी आदिवासी कातकरी आणि ठाकूर समाज यांचे मुळ मधमाशा पालन, कंदमुळे गोळा करणे आणि शिकार करणे हयावर त्यांचा उदरनिर्वाह होता. सागरी किनाऱ्यामुळे रायगड आणि ठाणे जिल्हयातही मिठागरेहा व्यवसाय आहे तसेच औद्योगिकीकरणामुळे इतरही सर्व जातीचे लोक आहेत.

साधारण १९८५ साली औद्योगिकरणास सुरवात झाली. सात भागात विकास केंद्राची विभागणी करण्यात आली. आधी फक्त भातशेती व मच्छीमारीवर अवलंबून असलेली जनता औद्योगिकरणामुळे रोजगार व स्वयंरोजगार मिळवू लागली समाज चंगळवादामुळे वळला. व्यसनाधीनता, समाजविघातक कृत्य, नितीमूल्यांच्या विरोधात. वर्तन समाजामध्ये वाढायला लागलं. औद्योगिकीकरणामुळे प्रदूषण वाढलं, शेतीवर तसेच आरोग्यावर परिणाम व्हायला लागला असे हळूहळू समाजात परिवर्तन व्हायला लागले.

औद्यौगिकीकरणापूर्वी लोकांमध्ये व्यसनाधीनता, भगतगिरी, अंधश्रद्धा, मूठ मारणेहयाचे प्रमाण जास्त होते समाजातील हया अज्ञानाचा गैरफायदा घेऊन काही प्रमाणात आर्थिक व मानसिक खच्चीकरण केले जात होते अज्ञानामुळे समाज आळशी व निष्क्रिय होत होता ही सर्व समाजातील दयनीय अवस्था बघून समाजातील लोकांच्या अंत:करणात मुळ बदल करणे हे ध्येय डोळयासमोर ठेवून समाज प्रबोधनाचे कार्य डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी निरूपणाद्वारे सुरू झाले.

**संशोधन विषय निवडीची उद्‌देश:**

समाजात अनेक व्यक्ती मोहाला बळी पडतात, त्यांना प्रलोभनांपासून दूर कसं रहाता येईल तसेच समाजातल्या वाढत्या दुष्प्रवृत्त लोकांना सत्यवृत्त करण्याकरिता जास्तीत जास्त वस्तुनिष्ठरितीने कोठेही अंधश्रद्धा न होता भावना,धरणा आणि प्रेरणा हया सत्यवृत्तीने हे विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे हा या संशोधनाचा हेतू.

**संशोधन विधान:**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी समाजसुधारक ते संत.

**संशोधनाची व्याप्ती**

संत परंपरा मिळायला फार मोंठ भाग्य लागतं त्या सर्व संतांच्या कार्याचा आढावा घेता असं लक्षात येंत, काही संत प्रवृत्तीपर तसेच काही निवृत्तीपर होते. (आता वृत्ती म्हणजे वागण्याचा वर्तणुकीचा काल प्रवृत्ती म्हणजे प्रत्यक्ष केले जाणार कर्म आणि निवृत्ती म्हणजे अलिप्तता)

हया शतकातले आधुनिक संत ''डॉ. नानासाहेब धर्माधिकारी''ही प्रवृत्तीपर होत. दासबोधाची शिकवण ''क्रियेवणि वाचाळता व्यर्थ आहे.'' त्यांनी अंगिकारली. ''आधी केले आणि मग सांगीतले'' ही तत्त्वे त्यांनी निरूपणातून लोकांपर्यत पोहोचवली. डॉ. नानासाहेब चे कार्य अनेक ठिकाणी बैठकींची निरूपणाच्या माध्यमातुन चालू आहे. अडीच तासची बैठक असते बैठकीला येणाऱ्या सदस्याची संख्या लाखोंनी आहे. बैठकींची संख्या पण बरीच आहे. कारण दर सप्ताहात कुठे तरी नवीन बैठक सुरू होते लहान मुलांकरिता बालसंस्कार मार्गदर्शन दीड तास दर रविवार असते.

म्हणून संशोधिकेनेआपल्या संशोधनात महाराष्ट्रात जेथे डॉ. श्री नानासाहेबांनी निरूपणे केली व पुढेही त्यांचे सदस्य ही परंपरा चालू ठेवीत आहेत तेथे तेथे जाऊन जनमानसावर हया निरूपणाचा होणारा परिणाम पडताळून बघणे, त्याचा अभ्यास करणे आणि निरिक्षण करणेअशी हया संशोधनाची व्याप्ती आहे.

**मर्यादा:**

ठाणे आणि रायगड जिल्हयात आदिवासी, ग्रामीण आणि शहरी हया तीन विभागात वर्गीकरण होते. काही काही ठिकाणी अति दुर्गम आदिवासी भाग असल्यामुळे त्या लोकांपर्यत पोहोचण्याच्या व त्यांच्यात झालेले बदल जाणून घेण्याकरिता मर्यादा येण्याची शक्यता वाटते.



Vol:2nd, Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June 2013,ISSN : 2319-5525

**विषयाचे महत्त्व व आवश्यकता**

**ह्या प्रभावाचा शास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न कुणीही केलेला नाही. डॉ. नानासाहेब यांनी सुरू केलेल्या समाज प्रबोधनाच्या कार्याचा फायदा मानसिक बदलांतून अनेक लोकांना झालाय. पैशांनी सगळी सुख विकत घेता येतात, पण समाधान मात्र विकत घेता येत नाही आणि बैठकीतून निरूपणाद्वारे हीच समाधानी वृत्ती जागरूक केली जाते.**

**गृहितके:**

**१. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्यामुळे ठाणे जिल्हयातील समाजाचे समाजिक परिवर्तन झालेले आहे.**

**२. ठाणे व रायगड जिल्हयाच्या समाजातील अनेक व्यक्ती व्यसनापासून दूर गेलेल्या आहेत.**

**३. मोहाला बळी न पडणे, प्रलोभनांपासून कसं दूर रहाता येईल, समाजातल्या वाढत्या दुष्प्रवृत्त लोकांना सत्प्रवृत्त करणे, कोठेही अंधश्रद्धा न होता भावना , धारण आणि प्रेरणा अशा गुणांमध्ये वाढ झालेली आहे.**

**४. समाजात जागरूतकता निर्माण होते.**

**सैद्धान्तिक पार्श्वभूमी:**

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिका ऐतिहासिक पद्धती, निरीक्षण पद्धती तर काही ठिकाणी व्यक्तिचरित्र संशोधन पद्धती व काही ठिकाणी आध्यात्मिक व विश्लेषणात्मक अशा शोध पद्धतीचा उपयोग करणार आहे.**

**संशोधनासाठी अवलंबिण्यात येणारे पद्धतीशास्त्र आणि स्वनांतले प्रणाली**

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिका व्यक्तिचरित्र संशोधन पद्धती व काही ठिकाणी आध्यात्मिक व विश्लेषणात्मक अशा शोध पद्धतीचा उपयोग करणार आहे.**

**स्वनांतत्रे प्रणाली:**

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिका पुढील स्वनांतत्रे प्रणालीचा उपयोग करणार आहे.**

**१ प्रश्नावली**
**२ मुलाखती**
**३ ध्वनिमुद्रक**
**४ व्हिडीओ कॅमेरा**
**५ प्रकाश चित्रे**

**निष्कर्ष**

काही मान्यवरांच्या मुलाखती घेतल्यानंतर असे निष्कर्ष निघाले की डॉ. नानासाहेबांनी सुरू केलेल्या कार्यामुळेसमाजातील लोकांच्या अंत: करणात बदल झाल्यामुळे, त्यांना त्यांची चुक कळायला लागली.

एका डॉक्टरांना प्रश्न विचारला, की तुम्ही तर डॉक्टर आहात, मग व्यसनमुक्ती होण्यात श्रवण, निरूपण आणि वैद्यकिय उपचारांचा अंतर्भाव असतो का ? की फक्त श्रवणाचाच?

उत्तरादाखल त्या म्हणाल्या, फक्त श्रवणाचाच उपयोग होतो कारण औषधाने शारीरिक सामर्थ्य मिळेल पण श्रवणाने मात्र मानसिक सामर्थ्य मिळतेआचाविचारांमध्येबदल घडतो. तसेच व्यसनामुळे आपण आपले व घरादाराचे नुकसान करतोय हे उमजायला लागते ती व्यक्ती कायमची व्यसनमुक्त होते मोहाला बळी पडत नाही.

...


संशोधन चेतना

वर्गणीचे दर

| | वैयक्तिक | संस्था |
|---|---|---|
| वार्षिक | ५००/- | ८००/- |
| त्रैवार्षिक | १२००/- | २४००/- |
| अजीव | ५०००/- | ७०००/- |

Contact No. - 022-25774206 / 9822569727
Email - sanshodhanchetana@gmail.com
Website - www.sanshodhanchetana.com